राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२०

| | | |
|---|---|---|
| **A** → संच क्रमांक | **2020** | **H14** |
| | प्रश्नपुस्तिका क्रमांक **BOOKLET NO.** | 103865 |
| | **प्रश्नपुस्तिका - 2** **मराठी व इंग्रजी** | **एकूण प्रश्न : 100** |
| **वेळ : 1 ( एक ) तास** | | **एकूण गुण : 100** |

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
↑ केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील."**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

www.reliableacademy.com 9922339999

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

1. योग्य विधान ओळखा.

(a) देवनागरी लिपीत प्रत्येक ध्वनिला स्वतंत्र चिन्ह आहे.

(b) संस्कृत व प्राकृत भाषांची देवनागरी लिपी आहे.

(c) मराठी भाषेच्या लिपीला 'देवनागरी लिपी' म्हणतात.

(d) देवनागरी या लिपीत कोणतेही चिन्ह एकापेक्षा अधिक ध्वनी दाखवितात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (a) व (b) बरोबर

(3) फक्त (a), (b) व (c) बरोबर (4) वरील सर्व पर्याय बरोबर

---

2. <u>अमृताहूनी</u> गोड नाम तुझे देवा.

अधोरेखित शब्दाला पर्यायी समानार्थी शब्द कोणता ?

(1) पय (2) क्षीर (3) जीवन (4) सुधा

---

3. 'पुण्यात्मके पापे स्वर्गा जाईजे' हे कोणत्या भावे प्रयोगाचे उदाहरण आहे ?

(1) शक्य भावे (2) समापण भावे (3) पुराण भावे (4) अकर्तृक भावे

---

4. खालील **होकारार्थी** वाक्याचे **नकारार्थी** वाक्य करा.

या लोकांचे अज्ञान पाहून मला दु:ख होते.

(1) या लोकांचे अज्ञान पाहून मला सुख होत नाही.

(2) या लोकांचे अज्ञान पाहून मला दु:ख होतेच असे नाही.

(3) या लोकांचे अज्ञान पाहून मला आनंद वाटत नाही.

(4) या अज्ञानी लोकांना पाहील्यावर दु:ख होते.

---

5. 'मध्यरात्री स्मशानभूमीत कोण जाईल ?' या प्रश्नार्थक वाक्याचे विधानार्थी वाक्यरूपांतर कोणते होईल ?

(1) मध्यरात्री स्मशानभूमीत कोण जाणार. (2) मध्यरात्री स्मशानभूमीत जावे.

(3) मध्यरात्री स्मशानभूमीत जाऊ नये. (4) मध्यरात्री स्मशानभूमीत कोणी जाणार नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

6. नामांच्या किंवा सर्वनामांच्या रूपात जो बदल होतो त्यास ________ म्हणतात.

(1) प्रयोग (2) प्रत्यय (3) विभक्ती (4) समास

---

7. शब्दयोगी अव्यय असलेली वाक्य ओळखा.

(a) घराजवळ विहीर आहे. (b) राम आणि सीता वनवासात गेले.

(c) घाईने पळाला म्हणून घसरुन पडला. (d) प्रेमापुढे पैशाची किंमत नसते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक

(2) केवळ (a) व (d) बरोबर, (b) व (c) चूक

(3) केवळ (b) व (c) बरोबर, (a) व (d) चूक

(4) केवळ (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक

---

8. महापुरें झाडें जाती। तेथें लव्हाळें वाचतीं। या म्हणीची समानार्थी म्हण कोणती ?

(1) उथळ पाण्याला खळखळाट फार (2) दर्याकिनारी केळी, मोडत नाही कदाकाळी

(3) जशी देणावळ तशी धुणावळ (4) कोळसा उगाळावा तितका काळाच

---

9. देशी शब्दांच्या गटाचा योग्य पर्याय :

(1) डोळा, डोके, डबा (2) झाड, गाजर, घोडा

(3) धोंडा, दगड, घोडा (4) हाड, पगार, मेहनत

---

10. अभ्यास न करणारा विद्यार्थी पास कसा होईल ? या केवल वाक्याचे मिश्रवाक्यात रूपांतर करा.

(1) ज्या विद्यार्थ्याने अभ्यास केला आहे तो नापास होणार नाही.

(2) जो विद्यार्थी अभ्यास करीत नाही तो पास कसा होईल ?

(3) जो विद्यार्थी अभ्यास करतो तो नापास होणार नाही.

(4) अभ्यास केलेला विद्यार्थी नापास होणार नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

11. धोंडा, बोका, रेडा हे शब्द कोणत्या भाषेतील आहेत ?

(1) देशी भाषा (2) फारशी भाषा (3) पोर्तुगीज भाषा (4) कानडी भाषा

---

12. 'आईला पाहताच बाळ खुदकन हसले'. या वाक्यातील क्रियाविशेषण वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) परिणामवाचक क्रियाविशेषण (2) रीतिवाचक क्रियाविशेषण

(3) निश्चयार्थक क्रियाविशेषण (4) निषेधार्थक क्रियाविशेषण

---

13. 'द्विज' या शब्दाचे अनेक अर्थ असणारा योग्य पर्याय :

(a) भुसुर, पक्षी, श्रेष्ठ (b) विप्र, दूध, दही (c) ब्राह्मण, दात, पक्षी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर (2) फक्त (c) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (a) व (c) बरोबर

---

14. तो तोंड उघडेल तर <u>ना</u>.

वरील वाक्यातील अधोरेखित केलेल्या क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार कोणता ?

(1) प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यये (2) संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये

(3) निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यये (4) स्थलकालवाचक क्रियाविशेषण अव्यये

---

15. 'मी देवळात गेलो तेव्हा **आपण** इकडे घरी आलात का ?' या वाक्यातील सर्वनामाचा प्रकार सांगून विभक्ती व वचन ओळखा.

(1) प्रकार – पुरुषवाचक, विभक्ती – द्वितीया, वचन – अनेकवचन

(2) प्रकार – दर्शक, विभक्ती – प्रथमा, वचन – एकवचन

(3) प्रकार – संबंधी, विभक्ती – पंचमी, वचन – अनेकवचन

(4) प्रकार – आत्मवाचक, विभक्ती – सप्तमी, वचन – एकवचन

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

16. वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | पाणी पडणे | (i) | आशा सोडणे |
| (b) | पाणी मुरणे | (ii) | पराभव करणे |
| (c) | पाणी पाजणे | (iii) | गुप्तकट शिजत असणे |
| (d) | पाणी सोडणे | (iv) | वाया जाणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

17. रचनेनुसार मिश्रवाक्ये कोणती ते ओळखा ?

(a) मी जेंव्हा घरी गेलो तेंव्हा जेवणे झाली होती हे कळले.

(b) तू पळत जा आणि हा निरोप दे.

(c) वारा सुटला आणि पाऊस गेला.

(d) पाऊस पडावा म्हणून शेतकरी वाट पाहत होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक

(2) केवळ (a) व (d) बरोबर, (b) व (c) चूक

(3) केवळ (a) आणि (d) चूक, (b) व (c) बरोबर

(4) केवळ (b) व (d) बरोबर, (a) व (c) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

18. समानार्थी शब्दाच्या जोड्या लावा :

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (a) | ढग | (i) | सविता |
| (b) | देव | (ii) | पयोधर |
| (c) | सूर्य | (iii) | अमर |
| (d) | चंद्र | (iv) | इंदू |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

---

19. व्यंजनाच्या बाबतीत **अचूक** असलेली विधाने वाचा :

(a) ज्या वर्णाचा उच्चार स्वरांच्या साहाय्यावाचून पूर्ण होत नाही त्यास व्यंजने म्हणतात.

(b) व्यंजने अपूर्ण उच्चाराची नसतात.

(c) व्यंजने लिहिताना ती पाय मोडून लिहितात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर, (c) चूक

(2) (b) व (c) चूक, (a) बरोबर

(3) (a) व (c) बरोबर, (b) चूक

(4) (a), (b) व (c) बरोबर

---

20. 'सर्वत्र सारखी परिस्थिती असणे' यासाठी खाली दिलेल्या म्हणीतून **योग्य** म्हण निवडा.

(a) पळसाला पाने तीन

(b) पदरी पडले पवित्र झाले

(c) घरोघरी मातीच्या चुली

(d) नव्याचे नऊ दिवस

**पर्यायी उत्तरे :**

(1) (c) आणि (d) बरोबर

(2) (a) आणि (b) बरोबर

(3) (a) आणि (c) बरोबर

(4) सर्व बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

21. मुंबई हे शहर कापडनिर्मितीत अग्रेसर आहे. या वाक्यातील मुंबई हे कोणते नाम आहे ?

(1) सामान्यनाम (2) विशेषनाम (3) भाववाचक नाम (4) समुदायवाचक नाम

22. घरघर या अभ्यस्त शब्दाचा वाक्यात उपयोग व योग्य प्रकार असलेला **अचूक** पर्याय कोणता ?

(1) मदत मिळविण्यासाठी तो घरघर फिरला - पुर्णाभ्यस्त शब्द

(2) सुनिल मुंबईला गेल्याने त्याच्या संसाराला घरघर लागली - अंशाभ्यस्त शब्द

(3) पीठाच्या गिरणीतील दाणे संपल्याने घरघर आवाज झाला - अनुकरणवाचक शब्द

(4) पालनजी शेठच्या कंपनीला आता घरघर लागली आहे - अंशाभ्यस्त शब्द

23. सभेत धीटपणे बोलणारा, या शब्दसमुहासाठी **अचूक** शब्द कोणता ?

(a) सभिष्ट (b) वक्ता (c) सभाधीट (d) व्याख्याता

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) आणि (d) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर (4) फक्त (a) आणि (d) बरोबर

24. 'रिटावर दिवा लावणे' या वाक्प्रचाराचा **अचूक** अर्थ सांगा.

(1) हुशारी दाखविणे (2) संकटाशी लढणे

(3) वंश चालविणे (4) ज्ञानाचा प्रकाश पाडणे

25. रीति भूतकाळाचे उदाहरण :

(1) सुरेश गीत गात असे. (2) सुरेश गीत गात असेल.

(3) सुरेश गीत गात असतो. (4) सुरेश गीत गात राहील.

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

26. पुढील विधानांपैकी योग्य विधान :

(a) सकर्मक क्रियापदाला कर्माची आवश्यकता नसते.

(b) अकर्मक क्रियापदाला कर्माची आवश्यकता असते.

(c) केवळ कर्ता व क्रियापद एवढ्यानेच सकर्मक धातूच्या बाबतीत विधान बहुधा पूर्ण होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर, (c) चूक

(2) (a) व (c) बरोबर, (b) चूक

(3) (b) व (c) बरोबर, (a) चूक

(4) (a) व (b) चूक, (c) बरोबर

---

27. खालीलपैकी 'फारशी' शब्दाचा गट ओळखा.

(a) गैरहजर, मुसलमान

(b) खुशी, दुकानदार

(c) तलबी, इरसाल

(d) भांडखोर, मजुरी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर

(2) फक्त (b) व (d) बरोबर

(3) फक्त (b) व (c) बरोबर

(4) फक्त (a) व (c) बरोबर

---

28. 'मुलांनी' या शब्दात ________.

(a) 'मु' हे एक अक्षर आहे

(b) 'मु' हे एक ध्वनिचिन्ह आहे

(c) 'मु' हा एक मूलध्वनी आहे

(d) म् व उ हे मूलध्वनी आहेत

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (d) बरोबर, (b) व (c) चूक

(2) (a), (b) व (d) बरोबर, फक्त (c) चूक

(3) फक्त (a) बरोबर, (b), (c) व (d) चूक

(4) (b) व (c) बरोबर, (a) व (d) चूक

---

29. मी घरी पोहचण्यापूर्वीच <u>सांजावले</u>. अधोरेखित शब्द कोणते क्रियापद आहे ?

(1) शक्य क्रियापद

(2) भावकर्तृक क्रियापद

(3) अनियमीत क्रियापद

(4) प्रयोजक क्रियापद

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

30. कर्तरी प्रयोगाबाबत :

(a) कर्तरी प्रयोगात कर्ता हा नेहमी प्रथमान्तच असतो.

(b) कर्म हे प्रथमान्त किंवा द्वितीयान्त असते.

(c) कर्ता हा धातुरूपेश असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) बरोबर, (c) चूक
(2) (a) बरोबर, (b) व (c) चूक
(3) (a) व (c) बरोबर, (b) चूक
(4) (a), (b) व (c) बरोबर

---

31. 'एखाद्या गोष्टीशी आपला संबंध न दाखविणे' या अर्थाचे वाक्प्रचार कोणते ?

(a) कानी कपाळी रडणे
(b) कानात बोटे घालणे
(c) कानाला खडा लावणे
(d) कानावर हात ठेवणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) आणि (c) बरोबर
(2) केवळ (b) आणि (d) बरोबर
(3) केवळ (a), (b) आणि (d) बरोबर
(4) केवळ (b), (c) आणि (d) बरोबर

---

32. प्रचलित लेखन नियमानुसार **अचूक** शब्दगट कोणता ?

(a) उफराटा, महशूर, अविष्कार, मथितार्थ
(b) आशीर्वाद, चिकटविणे, माहात्म्य, आहेर
(c) तुषार, विषाद, विषेश, विशद
(d) नुकसान, अनसूया, अनुग्रह, खुशाली

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर, (c) व (d) चूक
(2) फक्त (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक
(3) फक्त (a) व (d) बरोबर, (b) व (c) चूक
(4) फक्त (b) व (d) बरोबर, (a) व (c) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9422333999

**33.** बहुव्रीही समासाचे **अचूक** विग्रह असलेले उदाहरण कोणते ?

(a) सत्यव्रत – सत्य हेच व्रत.
(b) सत्यव्रत – सत्य हेच व्रत ज्याचे तो.
(c) सत्यव्रत – सत्य असलेले ते व्रत.
(d) सत्यव्रत – सत्य असे व्रत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) आणि (d) बरोबर
(2) केवळ (b) आणि (c) बरोबर
(3) केवळ (b) बरोबर
(4) केवळ (d) बरोबर

---

**34.** 'नाकाचा बाल' या म्हणीचा **योग्य** अर्थ असलेला पर्याय निवडा.

(a) अत्यंत अडचणीची परिस्थिती
(b) अत्यंत सुरक्षित
(c) अत्यंत अप्रिय व्यक्ती
(d) अत्यंत प्रिय व्यक्ती

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक
(2) फक्त (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक
(3) फक्त (d) बरोबर, (a), (b) व (c) चूक
(4) फक्त (b) बरोबर, (a), (c) व (d) चूक

---

**35.** दोन शब्दातील परस्पर संबंध दाखविणारे प्रत्यय, शब्दयोगी अव्यय किंवा इतर शब्द गाळून त्यांचा जो एक सुटसुटीत शब्द तयार होतो. त्या शब्दाला काय म्हणतात ?

(1) साधित शब्द
(2) सामासिक शब्द
(3) अभ्यस्त शब्द
(4) पूर्णाभ्यस्त शब्द

---

**36.** एखाद्या वाक्यात क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणारे जे काही शब्द असतील ते __________ या सदरात घातले जातात.

(1) उद्देशविभाग
(2) विधेयविस्तार
(3) विधानपूरक
(4) उद्देशविस्तार

---

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

37. खाली दिलेल्या म्हणी व त्याचे अर्थ **योग्य** जोड्या जुळवा.

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| (a) | षटकर्णी होणे | (i) | आदरतिथ्य |
| (b) | ढालगज भवानी | (ii) | जहांबाज |
| (c) | ताळूचा दात | (iii) | गवगवा होणे |
| (d) | बादरायण संबंध | (iv) | आवडती वस्तू |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

38. वाक्प्रचाराबाबत पुढील विधाने वाचा व **अचूक** विधानाचे पर्याय निवडा.

(a) वाक्प्रचार हा एक शब्दसमूह असतो.

(b) ते संपूर्ण वाक्य नसते.

(c) वाक्याचा तो एक भाग असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर, (b) व (c) चूक

(2) (a), (b) व (c) बरोबर

(3) (a) व (c) बरोबर, (b) चूक

(4) (b) व (c) बरोबर, (a) चूक

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

**39.** अर्थानुसार विधानार्थी व नकारार्थी वाक्य ओळखा :

(a) असे करतेवेळी मन घट्ट करावे.

(b) देवळापाशी एक भिकारी झोपला आहे.

(c) त्याला हे चित्र दाखव.

(d) कष्टाशिवाय यश मिळत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c) बरोबर

(2) फक्त (b) आणि (d) बरोबर

(3) फक्त (a) आणि (d) बरोबर

(4) फक्त (b) आणि (c) बोरबर

---

**40.** आमच्या बाबांनी काल मला एक बॅट दिली; ताईला छानसा बटवा दिला आणि आईला सुंदर साडी दिली. या वाक्यातील उद्देश्य विस्तार ओळखा.

(1) छानसा (2) बॅट (3) सुंदर साडी (4) आमच्या

---

**41.** विशेषणाचे प्रकार व त्यांची उदाहरणे यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | विशेषण प्रकार | | उदाहरण |
|---|---|---|---|
| (a) | गणनावाचक | (i) | साठावे वर्ष |
| (b) | पृथकत्ववाचक | (ii) | दुहेरी रंग |
| (c) | क्रमवाचक | (iii) | दहा मुले |
| (d) | आवृत्तिवाचक | (iv) | एकेक मुलगी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

42. 'तत्सम' शब्दाचा गट ओळखा.

(a) घास, कोवळा, पान, आग
(b) पृथ्वी, भगवान, पुष्प, कवि
(c) प्रीती, गुरु, विद्वान, कर
(d) घोडा, बोका, चिमणी, रेडा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) बरोबर
(3) फक्त (b) व (c) बरोबर
(4) (a), (b), (c) व (d) बरोबर

---

43. परमेश्वरा, मला चांगली बुद्धी दे. हे वाक्य कोणत्या प्रकाराचे आहे ?

(1) स्वार्थी वाक्य (2) आज्ञार्थी वाक्य (3) विध्यर्थी वाक्य (4) संकेतार्थी वाक्य

---

44. 'शब्द व समास' योग्य जोड्या जुळवा :

| **'अ' गट** | | **'ब' गट** | |
|---|---|---|---|
| (a) | नपुंसक | (i) | सहबहुव्रीही समास |
| (b) | कृष्णार्जुन | (ii) | नत्रबहुव्रीही समास |
| (c) | सुपुत्र | (iii) | इतरेतर द्वंद्व समास |
| (d) | घरदार | (iv) | समाहार द्वंद्व समास |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

45. बुद्धगयेचा पिवळा वारा. या मर्ढेकरांच्या उक्तीमधील शब्दशक्तीचा प्रकार ओळखा :

(a) अभिधा (b) लक्षणा (c) लक्षणा – व्यंजना (d) लक्षार्थ – व्यंग्यार्थ

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (b) व (d) बरोबर
(3) फक्त (c) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

**प्रश्न क्रमांक 46 ते 50 :**

**खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे सोडवा.**

आमच्या शेतकऱ्यांसारखे चौअंगी भोळे लोक पृथ्वीच्या पाठीवर दुसरीकडे कोठे असतील असें वाटत नाही. ही चार अंगे म्हटली म्हणजे, सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि व्यावहारी ही होत. या चारही अंगी पूर्ण चार चार आणे, म्हणजे, एकंदरीत बरोबर सोळा आणे भोळा किंवा शहाण्यांच्या गळहाट्यातले वेडे म्हटले म्हणजे आमचे शेतकरीच! यांनी सामाजिक व धार्मिक बार्बीचेही मुखत्यारपत्र जसें ब्रह्मदेवाच्या सहीशिक्क्यानिशी एका विशिष्ट लोकांस करून दिले किंवा त्यांनी ते बनावट करून घेतले तसेच राजकीय व व्यावहारिक बार्बीचेही मुखत्यारपत्र, त्याच लोकांनी स्वत:च्या सही शिक्क्यानिशी करून घेतले आहे. म्हणजे आता तान्ह्या पोराचे शुभाशुभ ग्रह पाहण्याच्या कामापासून, तो नुकतेच जन्मलेल्या कायद्याचा नाळ कापीपर्यंतचे बहुतेक सर्व विधी एकाच मुखत्यारांकडून करवून घेण्याची वेळ आली आहे! कालांतराने हीत पुष्कळ फेरफार होईल ती गोष्ट वेगळी, परंतु सध्या चालू असलेल्या प्रकारावरून, आमच्या शेतकऱ्यांच्या भोळैपणाची चतु:सिमा चांगली व्यक्त होत आहे यात संशय नाही. तेव्हा अशा चौअंगी भोळ्या लोकांस स्वयंभू किंवा जातीवंत अथवा उपजत मुखत्याऱ्यांनी प्रत्येक गोष्टीत चकविलें, किंवा फसविले अथवा ठकवित आणिले तर त्यांत काही नवल नाही. कारण जगांतील आम्ही सगळेच धूर्त-लोक भोळ्याभाबड्या लोकांस ठकवित असतों, असा पुरावा ते आपल्या स्वत:च्या बाजूने पुढे आर्णीत आहेत आणि तो त्याच्या दृष्टिने अगदी बरोबर आहे, सारांश धुर्ताच्या भोळ्या लोकांस गट्ट करण्याचा क्रम जसा सर्वत्र सतत चालू आहे, तसाच त्यांच्या जबड्यातून निसटण्यासाठी भोळ्यांचाही शक्तिनुसार धडपड करण्याचा क्रम सर्वत्र सतत चालू आहे, तेव्हा या बार्बीत कोणासच बरेवाईट वाटण्याचे किंवा मानण्याचे कारण नाही, असो.

पाणाडे हा शब्द त्याचा अर्थ बहुतेकास माहित आहेच. परंतु देवाडे हा शब्द जरी नवीन असला, तरी पण याच्याही अर्थाची फोड करून सांगण्याची आवश्यकता आहे असें आम्हास वाटत नाही. उभयतांच्या उच्चारदृश्यावरून किंवा यमकावरून, पाणाड्यांचा अर्थ देवाडे व देवाड्यांचा अर्थ पाणाडे सांगत आहेत! म्हणजे पाणी कोठे आहे हें सांगणारे - दाखविणारे ते पाणाडे व देव कोठे आहे हे सांगणारे - दाखविणारे ते देवाडे. या शब्दांचे असे सरळ अर्थ आहेत. अर्थात पाणाडे आणि देवाडे हे दोन वर्ग या पृथ्वीवरील मानवाप्राण्याच्या अत्यंत उपयोगी व आवश्यक असेच होत यांत संशय नाही. किंबहुना याच्या अस्तित्वांवाचून जगाचे तारण होणे शक्यच नाही म्हटले तरी चालेल. पहिला वर्ग पाण्याचे खरें ठिकाण दाखवून मनुष्याची शारीरिक तृषा तृप्त करितो! व दुसरा वर्ग देवाचे ठिकाण अमूक सांगून आत्मिक तृषा तृप्त करतो! परंतु या दोन वर्गात एक मोठा फरक आहे. पहिल्या वर्गात म्हणजे पाणाड्याच्या वर्गात सर्व धंद्यांची - जातींची माणसे सापडतात! पण दुसऱ्या वर्गात म्हणजे देवाड्यांच्या कळपात एकाच धंद्याची जातीची माणसे सापडतात! म्हणजे पाणडेपणाचा धंदा करण्याचा कोणास अटकाव नाही. परंतु देवाडेपणाचा धंदा करणाऱ्या देवाड्यांचा या कामी मोठाच अटकाव आहे! आमच्याशिवाय हा धंदा इतरांनी करूं नये, असे यांचे आग्रहाचे म्हणणे आहे. या म्हणण्यास भरभक्कम पुरावा म्हणून ते मोठमोठ्या शास्त्रांचा, व दांडग्या दांडग्या देवाचा व तोही तर्क चालत नाही अशा जुनाट काळापासूनचा देतात! परंतु ते सगळेच खोटे कारण देवाडपणाचा धंदा करणे हेच मुळी ढोंग आहे. मग पुराव्याची मातब्बरी ती काय राहिली? खरें म्हटले तर कोणाही माणसास खरा देवाड्या होण्यास अटकाव करण्याला सवडच नाही. यावरून पाणाड्यापेक्षा देवाडे वरच्या प्रतीचे भोंदू असावेत असा अंदाज करण्यास काही चिंता नाही. असो.

---

**46.** वरील उताऱ्यात व्यक्त झालेले विचार खालीलपैकी कोणत्या समाजसुधारकांच्या विचारांशी मिळते जुळते आहेत? **अचूक** पर्याय निवडा :

(1) बाबा पदमनजी
(2) महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले
(3) महर्षी धोंडो केशव कर्वे
(4) न्या. महादेव गोविंद रानडे

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

47. पाणाडे आणि देवाडे या दोन शब्दांमध्ये कोणते साधर्म्य आहे. असे लेखकास वाटते ?

(a) दोन्ही शब्दांच्याशेवटी 'डे' हे अक्षर आहे.
(b) दोन्ही शब्दांचे कार्य समान आहे.
(c) दोन्ही शब्दांचे यमक सारखेच आहे.
(d) दोन्ही शब्दांचा कार्यकारणसंबंध सारखाच आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर, (b), (c) व (d) चूक
(2) फक्त (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक
(3) फक्त (a), (c) व (d) बरोबर, (b) चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

48. वरील उतारा वाचल्यानंतर भोळ्याभाबड्या शेतकऱ्यांचे कोणत्या प्रकारचे शोषण होते. हे लक्षात येते ? **अचूक** पर्याय निवडा :

(a) आर्थिक व धार्मिक
(b) शारीरिक व मानसिक
(c) सांस्कृतिक व राजकीय
(d) वैचारिक व सांप्रदायिक

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक
(2) (b) व (d) बरोबर, (a) व (c) चूक
(3) (a), (b) व (d) बरोबर, फक्त (c) चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

49. लेखकाच्या मते मुखत्यारपत्र ब्रम्हदेवाने कोणास दिले आहे ?

(a) सवर्ण लोकांस
(b) भट लोकांस
(c) देवाडे लोकांस
(d) उच्च वर्णीय लोकांस

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) बरोबर, (a), (c) व (d) चूक
(2) फक्त (c) बरोबर, (a), (b) व (d) चूक
(3) फक्त (a) व (d) बरोबर, (b) व (c) चूक
(4) फक्त (b) व (c) बरोबर, (a) व (d) चूक

---

50. वरील उताऱ्यात कोणत्या सामाजिक व्यवस्थेचे वर्णन आले आहे ? **अचूक** पर्याय निवडा :

(1) कृषिव्यवस्था
(2) धर्मव्यवस्था
(3) चातुर्वर्ण व्यवस्था
(4) वर्गव्यवस्था

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9922333999

51. Which of the following suffixes **correctly** forms the adjective of the word 'fog' ?

(a) -ish (b) -gy (c) -ous (d) -ic

**Answer options :**

(1) Both (a) and (c) (2) (d) only

(3) (b) only (4) (a) only

---

52. Choose the sentence/s with **correct** punctuation marks.

(a) Oh doctor please help my child she cried doctor do something quickly.

(b) Oh doctor! please help my child, she cried Doctor do something quickly.

(c) Oh doctor, please help my child "she cried" doctor do something quickly.

(d) "Oh doctor! please help my child," she cried, "Doctor, do something quickly."

**Answer options :**

(1) (a) and (d) only (2) (b) and (c) only

(3) (d) only (4) (c) only

---

53. Choose the **correct** meaning of the underlined idiom in the sentence.

I am a straight forward man; I do not believe in double dealings.

(1) double business (2) deceive (3) double profit (4) politics

---

54. The building was surrounded by a team of special commandos.

[Change it into 'Active Voice']

(a) A team of special commandos surrounds the building.

(b) A team of special commandos had surrounded the building.

(c) A team of special commandos is surrounding the building.

(d) A team of special commandos surrounded the building.

**Answer options :**

(1) (a) is correct (2) (d) is correct

(3) (b) and (c) are correct (4) All are wrong

---

कच्च्या कामासाठी जागा/**SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

55. The committee __________ considered your request.

The verb which agrees with the subject – 'The committee' in notional concord is :

(a) are (b) is (c) has (d) have

**Answer options :**

(1) (c) only (2) (b) only (3) (a) only (4) (d) only

---

56. Choose the words having opposite to that of :

BOISTEROUS

(a) rowdy (b) calm (c) quite (d) tumultuous

**Answer options :**

(1) (a) and (c) only (2) (b) and (c) only

(3) (b), (c) and (d) (4) (b) and (d) only

---

57. To die is better than to surrender.

Which one of the following sentences substitutes a gerund for infinitive in the sentence above ?

(a) Dying is better than to surrender.

(b) To die is better than surrendering.

(c) Dying is better than surrendering.

(d) Dying and surrendering are better.

**Answer options :**

(1) (d) only (2) (a) only (3) (b) only (4) (c) only

---

58. Choose the **correct** meaning of the underlined idiom in the sentence.

It is with the help of the gift of the gab that he convinces every one.

(1) Power of reading (2) Power of speech

(3) Power of writing (4) Power of listening

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

59. Which one of the following words **correctly** matches the explanation. - 'A person who fails in the performance of his duty or commits an offence' ?

(a) derelict (b) deliquent (c) culprit (d) dilettante

**Answer options :**

(1) (d) only (2) (b) only (3) (a) only (4) (c) only

---

60. With which of the following words does the prefix "sub- " match **correctly** ?

(a) harass (b) let (c) absurd (d) human

**Answer options :**

(1) (a) and (d) only (2) (a), (b) and (c)

(3) (a) and (c) only (4) (b) and (d) only

---

61. Mr. Mehta manages a big industrial empire.

[Change it into 'Passive Voice']

(a) Mr. Mehta is managed by a big industrial empire.

(b) A big industrial empire is managed by Mr. Mehta.

(c) A big industrial empire is being managed by Mr. Mehta.

(d) A big industrial empire has been managed by Mr. Mehta.

**Answer options :**

(1) (b) (2) (a) (3) (c) and (d) (4) (a) and (d)

---



www.reliableacademy.com 9222333999

62. Match the following with similar meanings :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | complacent | (i) | stylish |
| (b) | genteel | (ii) | diligent |
| (c) | industrious | (iii) | self-satisfied |
| (d) | raze | (iv) | completely destroy |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

63. He left early; ________ he arrived late as usual.

Which one of the following connectors correctly fills the blank in the sentence above to show 'contrast' ?

(a) and (b) nevertheless (c) moreover (d) hence

**Answer options :**

(1) (c) only (2) (a) only (3) (d) only (4) (b) only

---

64. Gentlemanliness is at a discount these days.

The underlined idiom in the sentence above means ________.

(a) neglected (b) easily available

(c) declining (d) cheap

**Answer options :**

(1) (b) only (2) (d) only (3) (a) only (4) (c) only

---

कच्च्या कामासाठी जागा/**SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

65. Choose the **correct** synonym for the expression :

'Like an uncle'

(a) ventricular (b) auricular (c) avuncular

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only (3) (b) and (c) only (4) (b) only

66. Give synonyms of the following words :

attenuate, bourne, gaol

(a) reduce, destination, prison (b) appreciate, liberation, free

(c) thin, limit, jail (d) enhance, freedom, release

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (c) only

(3) (a), (b) and (c) (4) (b) and (d) only

67. Choose the **correct** phrase to complete the sentence.

He spoke to us ________.

(1) of great indifference (2) with great indifference

(3) for great indifference (4) above great indifference

68. Identify the sentence in which the word 'milk' is used as an adverb :

(a) Milk is good for health.

(b) I gave the baby a milk chocolate.

(c) He wore a milk white turban.

**Answer options :**

(1) (c) only (2) (b) and (c) only (3) (b) only (4) (a) only

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

69. No other train is as comfortable as the Tejas Express.

[Change the sentence into **Comparative Degree**]

(a) No other train is comfortable than the Tejas Express.

(b) The Tejas Express is more comfortable than any other train.

(c) Tejas Express is comfortable of all trains.

(d) The Tejas Express is the most comfortable than any other train.

**Answer options :**

(1) (a) and (c) correct (2) Only (d) correct

(3) Only (b) correct (4) All are correct

---

70. Don't annoy that bull or ________ may attack you.

Which one of the following pronouns correctly agrees with the noun 'bull' and fills in the blank in the sentence above ?

(a) they (b) he (c) she (d) it

**Answer options :**

(1) (a) only (2) (d) only (3) (c) only (4) (b) only

---

71. Change the compound sentence into complex sentence.

Search his pockets and you will find the watch.

(a) You will find the watch in his pockets.

(b) Search his pockets to find the watch.

(c) If you search his pockets, you will find the watch.

**Answer options :**

(1) (b) and (c) only (2) (c) only

(3) (a) and (b) only (4) (b) only

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

72. Which one of the following words is antonymous with the word 'extravagant' ?

(a) costly (b) showy (c) thrifty (d) abundant

**Answer options :**

(1) (c) only (2) (b) only (3) (a) only (4) (d) only

---

73. Identify the **correct indirect expression** from the following.

(a) He says that I have done my duty.

(b) He said that he has done his duty.

(c) He said that he had done his duty.

(d) He said whether he has done his duty.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) Only (c) (3) (b) and (d) (4) Only (d)

---

74. Change sentences into complex sentence.

Take exercise regularly.

Then you can keep fit and healthy.

(a) If you take exercise regularly, you can keep fit and healthy.

(b) Take exercise regularly you can keep fit and healthy.

(c) Regular exercise can keep you fit and healthy.

**Answer options :**

(1) (b) and (c) only (2) (a) only

(3) (a) and (c) only (4) (b) only

---



www.reliableacademy.com 9222333999

75. Give antonyms of the following words :

concur, devious

(a) agreement, tricky (b) approve, artful

(c) collaborate, cunning (d) disagree, straight

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (c) only

(3) (d) only (4) (c) and (d) only

---

76. Identify the **correct** sentence from the following.

(a) Walk carefully lest you should not stumble and hurt yourself.

(b) He renounced both his family as well as his friends.

(c) Although he is regular, he is slow in his work.

(d) Not only he is confident but also enterprising.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (c) and (d) (3) only (c) (4) (a) and (d)

---

77. Change the following simple sentence into compound sentence.

In spite of his high marks he did not get admission.

(a) He did not get admission of his high marks.

(b) He had high marks, still he did not get admission.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) only

(3) (a) only (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9922333999

**78.** Choose the sentence/s **incorrect**.

(a) I have not played cricket since I have left college.

(b) I have not played cricket since I left college.

**Answer options :**

(1) (b) only (2) (a) and (b)

(3) (a) only (4) None of the above

---

**79.** He asked me if I knew who that girl was.

Which one of the following is the **correct** Yes-No question corresponding to the sentence above ?

(a) Do you know who is that girl ?

(b) Did you know who is that girl ?

(c) Did you know who that girl was ?

(d) Did you ask me who that girl was ?

**Answer options :**

(1) (d) only (2) (b) only (3) (c) only (4) (a) only

---

**80.** Change the following simple sentence into compound sentence.

To his great disappointment he failed in the examination.

(a) He failed in the examination and he was greatly disappointed.

(b) His great disappointment is he failed in the examination.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) only

(3) (a) only (4) None of the above

---

कच्च्या कामासाठी जागा/**SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9422333999

**81.** Let the light be switched off.

Which one of the following sentences is the Active Voice corresponding to the sentence above ?

(a) You must switch off the light. (b) You should switch off the light.

(c) You have to switch off the light. (d) Switch off the light.

**Answer options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (b) only (4) (a) only

---

**82.** Identify the words which takes the prefix "en- " ?

(a) war (b) call (c) slave (d) danger

**Answer options :**

(1) (a), (c) and (d) (2) (b) and (c) only

(3) (c) and (d) only (4) (a) and (b) only

---

**83.** Which of the following is the **correct** meaning of the phrase ?

'to call a spade'

(1) speak truly (2) speak fluently (3) speak silently (4) speak frankly

---

**84.** Which word is opposite in meaning to the word printed in capitals in the given sentence ?

Eating bananas can be HEALTHY for babies.

(1) salubrious (2) luscious (3) deleterious (4) disservice

---

**85.** Identify the sentence in which the word 'mud' is used as an adjective :

(a) The hut is made of mud.

(b) He lives in a mud house.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b)

(3) (b) only (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9422333999

86. We ________ our hotel before it started raining.

Which one of the following verb forms expresses the action in Past Perfect in the sentence above ?

(a) reached (b) were reaching

(c) had reached (d) tried to reach

**Answer options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (b) only (4) (a) only

87. Which one of the following words is synonymous with the word 'lenient' ?

(a) lazy (b) luxurious (c) liberal (d) gentle

**Answer options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (b) only (4) (a) only

88. He has a narrow escape ________ danger.

Which one of the following prepositions correctly fills the blank in the sentence above ?

(a) from (b) of (c) with (d) at

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only (3) (d) only (4) (b) only

89. Choose the **correct** sentence.

(a) The professor brought out the idea clearly.

(b) The professor brought with the idea clearly.

(c) The professor brought in the idea clearly.

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only (3) (a) and (b) only (4) (b) only

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

**90.** None of us knew the way.

Which one of the following is the **correct** Tag question corresponding to the sentence above ?

(a) didn't we ? (b) did we ? (c) did none ? (d) did none of us ?

**Answer options :**

(1) (d) only (2) (a) only (3) (b) only (4) (c) only

---

**91.** Identify the **correct** meaning of the underlined phrase in the sentence.

I have been learning French <u>off and on</u> for some time past.

(1) regularly (2) sluggishly (3) irregularly (4) snappily

---

**92.** Let Srinath coach our fast bowlers.

Which one of the following sentences **correctly** changes the sentence above into Passive Voice ?

(a) Let our fast bowlers be coached by Srinath.

(b) Let Srinath be a coach of our fast bowlers.

(c) Let our bowlers be coached fast by Srinath.

(d) Let our bowlers be coached by Srinath fast.

**Answer options :**

(1) (c) only (2) (b) only (3) (d) only (4) (a) only

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

93. Delhi is one of the biggest cities in India.

Which one of the following sentences is the correct positive degree corresponding to the sentence above ?

(a) No other city is so big as Delhi in India.

(b) No other city in India is as big as Delhi.

(c) Very few cities in India are as big as Delhi.

(d) Delhi is a big city in India.

**Answer options :**

(1) (d) only (2) (c) only (3) (b) only (4) (a) only

---

94. Which one of the following explanations expresses the meaning of the word - 'Geneology' ?

(a) the study of the earth's surface

(b) the study of a person's genius

(c) account of a person's descent from his ancestors

(d) the study of the earth's inner part

**Answer options :**

(1) (b) only (2) (c) only (3) (d) only (4) (a) only

---

95. Choose the words having meaning opposite of :

IMMACULATE

(a) soiled (b) spotted (c) unblemished (d) stained

**Answer options :**

(1) (c) and (d) only (2) (b) and (d) only

(3) (a), (b) and (d) (4) (a), (c) and (d)

---

कच्च्या कामासाठी जागा/**SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9223399

**Read the following passage and answer the questions given below. (Q. No. 96 to 100)**

Few doctors have any time for the study of philosophy, for their profession is an exacting one, and it is all they can do to keep abreast of its advances. What is true of medical science is also true of the whole civilized world. Men at the present time, are so engrossed in their various occupations, in manufacturing goods, in buying and selling, in accumulating wealth, or in struggling merely to maintain themselves, in altering, their environment, in building for the future, and rushing hither and thither, that they have no time left to wonder what it is all about.

Up till recently there has existed an excuse for this failure on the part of civilized man to inquire into the why and wherefore of his existence. The way of prosperity that followed the industrial revolution, the triumphant progress of science, man's impressive conquest of the external world — all created a feeling of optimism. Man was marching forward to a glorious future. With the fate of man assured what need was there for him to interrupt his labours in order to inquire about his nature ? Speed was the key to success and those who moved fastest and crammed most activities into each fleeting hour would arrive first. There was no time to think.

But disillusionment has come, and we begin to doubt whether material prosperity is necessarily synonymous with successful living. We are discovering that much is wrong with the form of civilization that we have invented. Hitherto we have prided ourselves on our education, but in practically any country we find a decrease, rather than an increase, in the intellectual and moral culture of those responsible for our public affairs. Despite the immense hope we placed on it, our civilization has failed to develop men of intelligence and culture who are capable of guiding us along the dangerous road that we are treading. We can no longer rest satisfied with ourselves, or our leaders, and some of us are pausing for a moment and wondering whether the optimistic opinion of the world is any longer justified.

---

**96.** Which doubt is mentioned in the passage ?

(a) Man was marching forward to a glorious future.
(b) What is true of medical science is also true of the whole civilized world.
(c) Whether material prosperity is necessarily synonymous with successful living.
(d) We are discovering that much is wrong with the form of civilization that we have invented.

**Answer options :**

(1) (a) (2) (c) (3) (c) and (d) (4) (a) and (d)

---

**97.** Read the above passage carefully and answer the questions, given below.
According to the passage, which things have created a feeling of optimism.

(a) the industrial revolution and progress of science.
(b) study of philosophy.
(c) conquest of the external world.
(d) manufacturing of goods.

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (b) and (d)
(3) (a), (b) and (c) (4) (c) and (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com

98. Which statements are **false** according to the passage ?

(a) Men at the present time are not so engrossed in their various occupations.

(b) Much is wrong with the form of civilization that we have invented.

(c) What is untrue of the medical science is also true of the whole civilized world.

(d) Man was marching forward to a glorious future.

**Answer options :**

(1) (b), (c), (d) (2) (a), (c), (d) (3) (a), (b), (d) (4) (a), (b), (c)

---

99. Our civilization has failed to develop :

(a) intellectual and moral culture

(b) immense hope

(c) men of intelligence and culture

(d) public affairs

**Answer options :**

(1) (b) (2) (a) and (c) (3) (c) (4) (a) and (d)

---

100. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | abreast | (i) | enthrall |
| (b) | engrossed | (ii) | victorious |
| (c) | triumphant | (iii) | ambulate |
| (d) | disillusionment | (iv) | conversant |
| (e) | tread | (v) | disenchant |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** | **(e)** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) | (v) |
| (2) | (iv) | (i) | (ii) | (v) | (iii) |
| (3) | (i) | (iii) | (ii) | (iv) | (v) |
| (4) | (v) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

---

- o 0 o -

कच्च्या कामासाठी जागा/**SPACE FOR ROUGH WORK**



www.reliableacademy.com 9222333999

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या व्याक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333399

# परीक्षेचे नाव : राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२०

**विषय : प्रश्नपुस्तिका - २ मराठी व इंग्रजी** **परीक्षेचा दिनांक : ०४ डिसेंबर, २०२१.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत "**राज्य सेवा (मुख्य) परीक्षा -२०२०**" या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उत्तरतालिके संदर्भात उमेदवारांना हरकती सादर करावयाच्या असल्यास त्यांनी आयोगाकडून दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या प्रसिध्दीपत्रकातील तरतुदीनुसारच ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर केलेल्या हरकती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारल्या जाणार नाहीत. यासंदर्भात दिनांक ०३ जानेवारी, २०२२ पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच दखल घेतली जाईल. तदनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

## उत्तरतालिका – KEY

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | | प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D | | संच A | संच B | संच C | संच D |
| 1 | 3 | 3 | 2 | 3 | 26 | 4 | 4 | 3 | 4 |
| 2 | 4 | 2 | 3 | 2 | 27 | 2 | 4 | 2 | 3 |
| 3 | 3 | 2 | 1 | 4 | 28 | 2 | 2 | 2 | 2 |
| 4 | 1 | 2 | 3 | 4 | 29 | 2 | 4 | 2 | 3 |
| 5 | 4 | 3 | 3 | 1 | 30 | 4 | 2 | 3 | 3 |
| 6 | 3 | 3 | 2 | 4 | 31 | 2 | 2 | 3 | 2 |
| 7 | 2 | 3 | 2 | 2 | 32 | 4 | 2 | 4 | 1 |
| 8 | 2 | 4 | 2 | 2 | 33 | 3 | 1 | 2 | 2 |
| 9 | 3 | 3 | 3 | 2 | 34 | 3 | 3 | 4 | 1 |
| 10 | 2 | 3 | 2 | 4 | 35 | 2 | 2 | 3 | 3 |
| 11 | 1 | 2 | 2 | 2 | 36 | 2 | 3 | 2 | 3 |
| 12 | 2 | 4 | 4 | 4 | 37 | 3 | 2 | 2 | 3 |
| 13 | 2 | 2 | 2 | 4 | 38 | 2 | 2 | 4 | 2 |
| 14 | 3 | 2 | 2 | 2 | 39 | 2 | 3 | 4 | 2 |
| 15 | 1 | 2 | 4 | 2 | 40 | 4 | 1 | 1 | 2 |
| 16 | 2 | 3 | 3 | 3 | 41 | 3 | 1 | 3 | 3 |
| 17 | 2 | 1 | 2 | 2 | 42 | 2 | 1 | 2 | 3 |
| 18 | 4 | 2 | 4 | 3 | 43 | 2 | 2 | 3 | 2 |
| 19 | 3 | 4 | 1 | 2 | 44 | 2 | 4 | 3 | 4 |
| 20 | 3 | 2 | 2 | 1 | 45 | 4 | 4 | 1 | 2 |
| 21 | 2 | 2 | 1 | 1 | 46 | 2 | 4 | 2 | 2 |
| 22 | 1 | 2 | 2 | 3 | 47 | 4 | 4 | 4 | 4 |
| 23 | 3 | 3 | 3 | 3 | 48 | 4 | 2 | 3 | 3 |
| 24 | 3 | 3 | 2 | 2 | 49 | 4 | 3 | 4 | 4 |
| 25 | 1 | 3 | 4 | 2 | 50 | 3 | 4 | 4 | 4 |

www.reliableacademy.com 9922533999

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 51 | 3 | 2 | 2 | 3 |
| 52 | 3 | 2 | 2 | 2 |
| 53 | 2 | 2 | 1 | 2 |
| 54 | 2 | 2 | 2 | 4 |
| 55 | 4 | 4 | 4 | 1 |
| 56 | 2 | 3 | 1 | 2 |
| 57 | 4 | 1 | 4 | 1 |
| 58 | 2 | 3 | 3 | 2 |
| 59 | 2 | 1 | 2 | 4 |
| 60 | 4 | 2 | 4 | 4 |
| 61 | 1 | 2 | 2 | 4 |
| 62 | 4 | 4 | 2 | 1 |
| 63 | 4 | 4 | 4 | 2 |
| 64 | 4 | 3 | 2 | 2 |
| 65 | 2 | 2 | 3 | 3 |
| 66 | 2 | 3 | 3 | 2 |
| 67 | 2 | 1 | 4 | 2 |
| 68 | 1 | 3 | 1 | 3 |
| 69 | 3 | 3 | 4 | 3 |
| 70 | 2 | 4 | 3 | 2 |
| 71 | 2 | 3 | 2 | 3 |
| 72 | 1 | 1 | 3 | 3 |
| 73 | 2 | 1 | 1 | 3 |
| 74 | 2 | 3 | 2 | 1 |
| 75 | 3 | 3 | 1 | 3 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 76 | 3 | 3 | 3 | 2 |
| 77 | 2 | 3 | 3 | 3 |
| 78 | 3 | 1 | 1 | 1 |
| 79 | 3 | 3 | 4 | 4 |
| 80 | 3 | 2 | 1 | 4 |
| 81 | 1 | 2 | 2 | 2 |
| 82 | 3 | 4 | 4 | 1 |
| 83 | 4 | 2 | 3 | 1 |
| 84 | 1 | 4 | 2 | 1 |
| 85 | 3 | 4 | 3 | 4 |
| 86 | 2 | 1 | 3 | 2 |
| 87 | 1 | 2 | 1 | 3 |
| 88 | 1 | 2 | 3 | 2 |
| 89 | 1 | 2 | 2 | 2 |
| 90 | 3 | 2 | 3 | 3 |
| 91 | 3 | 3 | 2 | 4 |
| 92 | 4 | 2 | 3 | 3 |
| 93 | 2 | 4 | 2 | 3 |
| 94 | 2 | 2 | 2 | 2 |
| 95 | 3 | 1 | 2 | 2 |
| 96 | 2 | 1 | 2 | 2 |
| 97 | 1 | 2 | 2 | 2 |
| 98 | 2 | 2 | 1 | 1 |
| 99 | 3 | 2 | 3 | 2 |
| 100 | 2 | 3 | 2 | 3 |

www.reliableacademy.com 9222333999